# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र. :- कबोचौउमवि/१६/बातमी-सीटीपीसी/हस्तदेय/२०२२ दिनांक : २० जून,२०२२

जळगाव दि.२० ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षातंर्गत स्कूल ऑफ केमिकल सायन्सेस येथील विद्यार्थ्यांसाठी कोरोमंडल इंटरनॅशनल लि., हैदराबाद या कंपनीद्वारा घेण्यात आलेल्या परिसर मुलाखतीद्वारे चार विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

कोरोमंडल इंटरनॅशनल लि. हैदराबाद या नामांकित कंपनी तर्फे एम.एस्सी.(आर्गेनिक अनॉलिटीकल,इंडस्ट्रियल आणि पेस्टीसाईड व ॲग्रो केमिस्ट्री ) च्या विद्यार्थ्यांसाठी परिसर मुलाखतीचे आयोजन विद्यापीठात करण्यात आले होते. यासाठी एकूण ६५ विद्यार्थी उपस्थित होते. या विद्यार्थ्यांची परीक्षा व मुलाखत घेण्यात आली असून त्यात संदीप राजपूत, गणेश पवार, योगराज पाटील आणि आकाश पाटील या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक वेतन रुपये दोन लाख, चार हजार इतके देण्यात येणार आहे. यासाठी केंद्रिय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा व समन्वयक डॉ.अमरदीप पाटील यांनी व्यवस्थापन केले. मा.कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्रभारी प्र.कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, प्रभारी कुलसचिव प्रा.किशोर फ.पवार, समन्वयक प्रा.रमेश सरदार, उपसमन्वयक डॉ.उज्वल पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

---

प्रति,

मा. संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त् बातमीस आपल्या जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयाच्या दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी